MHPU180021622016

<u>नि.दि.दा.क्र. ३०५/२०१६</u>
**(प्रविण व इतर वि. यशवंत व इतर)**

## <u>निशाणी ४८ वरील आदेश</u>

(दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३, ७ व ८ यांनी कैफीयत मध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणने असे की, वादींनी प्रतीवादींविरुध्द दावा मिळकतीमधील अतिक्रमण काढुन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

३. सदर दाव्यास प्रतिवादींनी कैफियत दिली आहे. कैफियतमध्ये सर्व्हे नंबर व पोटचारी बाबतचा आवश्यक मजकुर नमुद करणे नजरचुकीने राहुन गेलेले आहे. सदरची दुरुस्ती दाव्यातील अंतीम निर्णयासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादींना कैफियतमध्ये अर्जाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित परिच्छेद क्र. ६.अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तसेच कैफीयतच्या परिच्छेद क्र. १०, ११.अ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादींनी प्रस्तावित दुरूस्ती अर्जात नमुद केली आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे बचावाचे स्वरूप बदलणार नाही असे नमूद केले आहे. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे कैफीयतमध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

४. प्रस्तूतच्या अर्जास वादींनी आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, सदर अर्ज खरा, बरोबर व कायदेशिर नसुन त्यामधील मजकुर व मागणी सुध्दा खरी, बरोबर व कायदेशिर नाही. ज्या दुरुस्ती प्रतिवादींनी करुन मागितल्या आहेत ती कथने प्रतिवादींना मुळ कैफियतीमध्येही नमुद

करता आली असती ती त्याच वेळी का नमुद केली नाहीत. सदर अर्जाने दुरुस्ती करावी असे नविन कोणतेही कारण घडलेले नाही. सदरील दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची नाही दुरुस्तीमुळे कैफियतीमध्ये पुर्ण स्वरुपच बदलुन जात आहे. सदरील अर्ज देण्याचे कारण व सदरील मजकुर कैफीयतीमध्ये नमुद करण्याचे का राहीले यांचे कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे सदरील अर्ज कायदेशिर नाही. सदरचा अर्ज बेकायदेशिर असुन फेटाळण्यात यावा.

५. अर्जदारांच्या वकीलांचा व वादीच्या वकीलांचा यूक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, योग्य न्यायनिर्णयासाठी प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर करावा.

६. वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी कैफियतमध्ये सदर मजकुर नमुद करण्याचे का राहिले याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण उद्भवलेले नाही. म्हणून, अर्ज खर्चासह नामंजुर करावा.

७. प्रस्तूत अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती अन्वये अर्जदार स्पष्टीकरणात्मक दुरुस्ती कैफियतमध्ये करु इच्छित आहे. अशा परिस्थितीत बचावाच्या मुळ स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. अर्जदारांनी कोणतीही कबुली प्रस्तावित दुरूस्तीन्वये काढून घेतलेली नाही.

८. कैफियतमध्ये व दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याचे निकष हे तंतोतंत सारखे नाहीत. कैफियतमध्ये बचावाचा नवीन मुद्दा किंवा बचावात बदल केल्यामुळे वादीस अडचणीचे ठरत नाही. कैफियतमध्ये दुरुस्ती करण्याच्या बाबतीत न्यायालये उदार मतवादी असतात. दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी लागणा–या कठोर कसोटया कैफियतमध्ये दुरुस्ती करण्यासाठी लागत नाही असे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी बलदेव सिंग आणि इतर वि. मनोहर सिंग आणि इतर, २००६ (५) एसएससी ६३४ या न्याय निवाडयात नमुद केले.

९. प्रस्तावीत दुरुस्तीने अर्जदार दावा मुदतीत नाही हा बचाव घेवू इच्छित आहे. सदर बचाव केंव्हाही घेता येतो त्यामुळे वादीच्या आक्षेपात तथ्य दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे, उर्वरित दुरुस्ती हि स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची आहे. त्यामुळे, अर्जदार कोणतीही कबुली काढ्ढुन घेत नाहीत. अशा परिस्थितीत, प्रस्तावित कैफीयत दुरूस्तीमुळे वादीस काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने वादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये प्रतिवादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते.

१०. दाव्यामध्ये अद्याप पुराव्यास सुरुवात झालेली नाही. अशा परिस्थितीत, वादींना प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास काहीही अडचणीचे ठरणार नाहीत. वादींनी दावा दुरुस्ती अर्ज दाखल केला होता तो देखील मंजुर करण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादींना दुरुस्त दाव्याच्या अनुषंगाने अतिरिक्त कैफियत देण्याचा हक्क देखील प्राप्त झालेला आहे. त्यामुळे, अर्ज विनाखर्च मंजुर करणे योग्य राहिल या निष्कर्षास मी येत आहे. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहेः–

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. अर्जदारांना अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे कैफियतमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.
३. अर्जदारांनी कैफीयतमध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही १४ दिवसात किंवा तत्पूर्वी करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Nandkumar Balasaheb Jadhav
Date: 2021.02.23 12:42:49 +0530

दौंड.
दिनांकः २३/०२/२०२१.

(एन.बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, न्यायालय क्र. १.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 23/02/2021. |
| Judgment signed by P.O. on | : | 23/02/2021. |
| Judgment uploaded on | : | 23/02/2021. |